REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख २३ जून, १९४८ | अंक २५


## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,११,८९० |
| खेळतें भांडवल | रु. ६६,५०,००० |

मुंबई शाखाः—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

" बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे. "

श्री. गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी.,
मॅनेजर

श्री. सी. टी. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर



## वेस्टर्न इंडियाचीं कांहीं वैशिष्ट्यें.

१ ही कंपनी गेलीं ३४ वर्षे विमा क्षेत्रांत समाजाची सेवा करीत आहे.

२ विमेदारांस ही कंपनी अव्याहतपणें बोनस देऊं शकली आहे. अशा कंपन्या हिंदुस्थानांत फारच थोड्या आहेत.

३ कंपनीच्या खर्चाचें प्रमाण अत्यंत अल्प आहे व विम्याचे हप्तेही माफक असेच आहेत.

४ सन १९४७ सालांत नवीन काम २,११,००,००० रु. चे वर झालें आहे.

५ कंपनीनें विमेदारांच्या सोयीच्या अशा अनेक आकर्षक योजना काढलेल्या आहेत. प्रिमिअम ॲडव्हान्स अकौन्ट ही कंपनीची योजना अभिनव अशी आहे.

६ शैक्षणिक व व्यापारी संस्थांसाठीं " ग्रुप इन्शुअरन्स" योजना काढली आहे. त्यांत हप्त्यांत साडेसात टक्के सूट दिली जाते.

७ क्लेमची रक्कम देण्यांत अत्यंत तत्परता दाखविली जाते.

८ अत्यंत भक्कम अशी आर्थिक स्थिति आहे.

**हीं वैशिष्ट्यें लक्षांत घेऊन प्रत्येक कुटुंबप्रमुखानें आपला विमा ह्याच कंपनींत उतरावा, अशी विनंति आहे.**

पुणें ऑफिस—
१७९ बुधवार पेठ, पुणें शहर.

कृ. य. जोशी, बी. ए., एफ. आय. ए. (लंडन)
मॅनेजर,
वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, सातारा.

वर्कशॉप मशिनरी (२)
हेवी ड्यूटी
शिमोगा लेथ
(८′—१०″)
संपूर्ण देशी पहिल्या प्रतीचा, तज्ज्ञांचे देखरेखीखालीं कुशल कारागिरांनीं अद्यावत् साधनांनीं बनविलेला
— चौकशी स्थान —
केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २.

# विविध माहिती

**श्री. दाबके ह्यांची निवडणूक**—असोसिएशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज ह्या संस्थेचे १९४८–४९ सालचे अध्यक्ष म्हणून मि. युसफअली महंमदअली ह्यांची निवड झाली आहे. मि. बी. एस्. दाबके व एम्. पी. मर्चंट ह्यांची उपाध्यक्ष म्हणून निवडणूक झाली आहे.

**ओरिएंटल विमा कंपनीच्या नौकरांची तक्रार**—ओरिएंटल विमा कंपनीचे मुंबईमधील व पुणें शाखांतील नोकर आणि कंपनी ह्यांच्यामधील पगारासंबंधींचा तंटा औद्योगिक कोर्टाकडे सोंपविण्यांत आला आहे.

**चेकवर जबरीनें सही**—डाका मेलमधून पहिल्या वर्गानें प्रवास करणाऱ्या एका उतारूला पिस्तूल रोखून कांहीं गुंडांनीं लुबाडलें. बराकपूर येथें हे गुंड डब्यांत शिरले. गाडी चालू लागतांच उतारूवर पिस्तूल रोखून त्याच्याकडून ४ हजार रुपयांच्या चेकवर जबरीनें सही घेण्यांत आली. त्याशिवाय त्याच्याजवळील रिस्ट वॉच व सोन्याची आंगठीहि काढून घेण्यांत आली.

**हिंदुस्थानसाठी डॉलर्स**—इंटर-नॅशनल मॉनेटरी फंडांतून हिंदुस्थानला ८० लाख, ६० हजार डॉलर्स मिळाल्याचें जाहीर झालें आहे. ही रकम मिळविण्यासाठीं योग्य ती हिंदी रुपयांची हुंडणावळ अर्थातच फंडाकडे जमा करण्यांत आली आहे. आतांची रकम धरून हिंदुस्थानला आतांपर्यंत ३ कोटी, ६० लाख, ६० हजार डॉलर्स मिळाले आहेत.

**हिंदुस्थानसाठी इंग्लंडकडून भांडवली माल**—ब्रिटनचे परराष्ट्र व्यापार मंत्री, मि. बॉटम्ले, ह्यांनीं नुकतीच अशी माहिती सांगितली कीं १९४७ सालीं ब्रिटननें जितका भांडवली स्वरूपाचा माल परदेशीं पाठवला, त्यापैकीं १२ टक्के माल पाकिस्तान व हिंदुस्थान ह्यांनीं घेतला. ब्रिटनच्या परराष्ट्रीय व्यापारांत भांडवली स्वरूपाचा माल २८ टक्के होता. पण, हिंदुस्थानांत आयात झालेल्या मालांत भांडवली मालाचें स्वरूप ४२ टक्के होतें. ब्रिटननें निर्यात केलेल्या यंत्रसामुग्रीपैकीं १७ टक्के यंत्रसामुग्री पाकिस्तान व हिंदुस्थान ह्या देशांनीं घेतली.

**इजिप्तकडून कापूस घेणार**—ताग आणि चहा ह्यांच्या बदला इजिप्तकडून लांब धाग्याचा कापूस खरेदी करण्याचे हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. त्यासाठी एक हिंदी शिष्टमंडळ लवकरच वाटाघाटी करण्यासाठीं इजिप्तला धाडण्यांत यावयाचें आहे.

**शेतीच्या मालासाठी बाजारपेठेची जरूरी**—हिंदुस्थान सरकारकडे शेतकी, जंगलें आणि मच्छिमारी ह्या धंद्यांच्या कमिटीनें आपला अहवाल सादर केला आहे. ह्या कमिटीनें नेमलेल्या उपसमितीनें शेतीच्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठीं एक अखिल भारतीय स्वरूपाचें मार्केटिंग बोर्ड नेमण्याची शिफारस केली आहे. शेतीच्या मालाचें त्याच्या दर्जाप्रमाणें वर्गीकरण करणें, बाजारपेठ कशी मिळवावी ह्याची माहिती देणें, किंमती ठरविणें व जकातींचा विचार करणें इत्यादि कार्यांचा विचार उपसमितीनें केला आहे. सहकारी तत्त्वावर मालाची खरेदी-विक्री करणाऱ्या संस्थांची वाढ करावी, ह्या संबंधी अहवालांत विशेष जोर देण्यांत आला आहे. ह्या संस्थांनीं मालाची साठवणूक करणें, प्रतवार लावणें व माल बाजारांत नेणें, इत्यादि कामें सभासदांच्या वतीनें करावयाचीं आहेत. ज्या खेडगांवांतील ६० टक्के लोक अशा सहकारी संस्था काढण्यास तयार असतील, त्या गांवीं संस्था काढण्याची सक्ती करण्यांत यावी अशीही सूचना अहवालांत करण्यांत आली आहे.

**गांधीजींच्या स्मरणार्थ तिकिटें**—महात्मा गांधींच्या स्मरणार्थ हिंदुस्थान सरकारनें १५ ऑगस्ट रोजीं खास पोस्टाचीं तिकिटें विकण्याचें ठरविलें आहे. हीं तिकिटें १½ आण्याचीं, ३½ आण्याचीं, १२ आण्याचीं आणि १० रुपयांचीं अशी चार प्रकारचीं आहेत. तिकिटें फक्त तीनच महिने वापरांत रहावयाचीं आहेत. ह्या ५० लाख तिकिटांचा पहिला हप्ता स्वित्झरलंडमधून नुकताच हिंदुस्थानांत आणण्यांत आला. स्वित्झरलंडमधून इंग्लंडकडे व अमेरिकेकडे तिकिटें पाठविण्याची खास सोय करण्यांत आली आहे.

**हिंदी साखरेसंबंधीं कांहीं माहिती**—हिंदुस्थानांतील पिकाखालील एकूण क्षेत्रापैकी फक्त २% क्षेत्रांत ऊंस होतो. परंतु, उसाच्या जागतिक लागवडीच्या ३५% इतकी मोठी हिंदी लागवड आहे. त्यांत एकूण ३३ कोटी रुपये भांडवल गुंतलेलें आहे. हिंदी साखरेचें वार्षिक उत्पादन १३ लक्ष टनांवर आहे. ह्या धंद्यांत ३,००० पदवीधर, १,००,००० तज्ञ व साधे कामगार आणि २ कोटी शेतकरी गुंतलेले आहेत. दरमाणशीं वार्षिक साखरेचा खप ग्रेट ब्रिटनमध्यें ५३ शेर, अमेरिकेंत ४८½ शेर व हिंदुस्थानांत १३½ शेर आहे.

**वाटेल तेवढी साखर निर्गत करा**—हिंदुस्थानांतून आतां वाटेल तेवढी साखर निर्गत करता येईल; परवान्याची आवश्यकता नाहीं.

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. २३ जून १९४८




प्रो. वा. गो. काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## शेतीचें उत्पादन सुधारण्याचे कांहीं मार्ग

हिंदी संघराज्यानें जमिनीची सुधारणा करून धान्याचें उत्पादन कसें व कोणत्या निरनिराळया प्रकारांनीं वाढविणें इष्ट आहे याचा विचार सर दातार सिंग यांच्या अध्यक्षत्वाखाली मद्रास येथें भरलेल्या बोर्ड ऑफ अग्रिकल्चरच्या 'पिकें व जमीन' यांचा विचार करणाऱ्या मंडळानें नुकताच केला. गेल्या कांहीं वर्षांत अधिक धान्य पिकविण्याचे सरकारनें प्रयत्न केले परंतु हे सर्व प्रयत्न हिंदच्या आजच्या गरजेच्या मानानें, व विशेषतः अतिशय महाग दरानें परराष्ट्रांतून धान्य आयात करावें लागत असतांना, फारच अपुरे पडले आहेत असें मत परिषदेंत व्यक्त करण्यांत आलें. सर दातार सिंग म्हणाले कीं जमीन सुस्थितींत राखून तिचा जास्तींत जास्त उत्पादनाच्या दृष्टीनें उपयोग करण्याकडे सरकारनें लक्ष दिलें पाहिजे. हे दोनहि प्रश्न सर्व हिंदच्या दृष्टीनें एकाद्या मध्यवर्ती संस्थेमार्फत सोडविले पाहिजेत. मद्रासचे पंतप्रधान श्री. रामस्वामी रेड्डिअर ह्यांनीं जमिनीची बाह्य दृष्ट्या व अंतर्गत दृष्ट्या अशी दुहेरी पहाणी करणें आवश्यक आहे असें सुचविलें. आजच्या काळांत भांडवलदार, मजूर इतर नोकर वर्ग हे सर्व आर्थिक जीवनाच्या स्थैर्याची सरकारकडून अपेक्षा करितात; परंतु शेतकऱ्याला जीवनविषयक आर्थिक दृष्टया शाश्वति कोठें आहे, असा प्रश्न श्री. रेड्डिअर ह्यांनीं केला. मद्रास इलाख्यांत ७२ लक्ष पातेदारांपैकी ६६ लक्ष पातेदारांच्या जमिनी 'किफायतशीर न होण्याइतक्या लहान' अशा सदरांत येतात. त्या बाबतींत जमिनीचा मगदूर वाढविण्यासाठीं शास्त्रज्ञांनीं पुढें आलें पाहिजे व जमिनीची सुपिकता वाढविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत असेंहि त्यांनीं सुचविलें.

परिषदेमध्यें शेतीच्या आजच्या परिस्थितिबद्दल अनेक विधायक योजना सुचविण्यांत आल्या. धान्याचें उत्पादन वाढविण्यासाठी निरनिराळया हवामानांच्या दृष्टीनें पिकांचें दर एकरी उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न केले गेले पाहिजेत. उत्पादन वाढविण्यासाठीं जमिनीचा जास्तींत जास्त उपयोग करवून घेण्यासाठी प्रांतिक प्रादेशिक जमीन उपयोगांत आणण्याचीं मंडळें (बोर्ड्स ऑफ लँड युटिलिझेशन) स्थापन करण्यांत यावीं. ह्या मंडळांनीं उत्पादन वाढविण्यासाठीं पुढील गोष्टींकडे बारकाईनें लक्ष पुरविलें पाहिजे:—पाटबंधारे, विहिरी किंवा तत्सम मार्गांनीं पाणीपुरवठा सुधारणें, खतें, योग्य प्रकारचें बीं-बियाणें, फळें व भाजीपाला यांची लागवड, शेतीचीं हत्यारें सुधारणें, पिकें नासून जाऊं नयेत याबद्दल काळजी घेणें, पिकांचे पेरे करण्याच्या दृष्टीनें नियोजन व सर्वसाधारण प्रसिद्धी. लागवडीस येऊं शकणारी परंतु ज्यांत लागवड केलेली नाहीं अशी सर्व जमीन सरकारला आपल्या ताब्यांत घेतां आली पाहिजे, व तिची मशागत करण्याची व्यवस्था करण्यांत यावी. पिकाची आंखणी करतानां लोकांच्या स्थानिक आहारविषयक संवयी लक्षांत घेण्यांत याव्या. शेत जमिनीची आवश्यक ती तातपुरती सुधारणा करण्याचे सर्व अधिकार सरकारनें तातडीची व्यवस्था म्हणून आपल्या हातांत ठेवावे. शेती आर्थिक दृष्टया यशस्वी करण्यासाठी सहकारी, सांघिक, किंवा सम-भाग मालकीच्या तत्त्वावर शेतीची लागवड कशी करतां येईल याबद्दल एखादा तज्ज्ञ नेमून विचार करावा व योजना आखाव्या. गुरांसाठी लागणाऱ्या गवताची निपज व पुरवठा हीं कशी सुधारतां येतील याबद्दलहि सूचना करण्यांत आल्या. तांब लागून गव्हाच्या पिकाची नासाडी होते याचा विचार केला गेला. दक्षिण हिंदुस्थानांतील कांहीं भागांत उन्हाळयांत गव्हाची लागवड करण्यांत येऊं नये ही व्हीट रस्ट कंट्रोल कमिटीची सूचना मान्य करण्यांत आली. प्रत्येक प्रांतांत तांबीपासून बचाव करण्यासाठी डस्टिंग मशीन्स व सल्फर डस्ट पुरविण्यांत यावी.

शेतीच्या निरनिराळया बाबींकडे सरकारचें, विशेषतः मध्यवर्ती सरकारचें लक्ष वेधलें आहे हें वरील माहितीवरून दिसून येतें. सरकारी प्रयत्न, सूचना व कार्यक्रम हीं सर्व शक्य तितक्या लौकर ग्रामीण शेतकरी वर्गापर्यंत पोंचलीं पाहिजेत; तरच अन्नधान्याचा प्रश्न सुटेल व हल्लींच्या नाजूक परिस्थितींत धान्याच्या आयातीवर होणाऱ्या भरमसाट खर्चांत मोठी बचत करतां येईल.

---

## जाहिरातीवरील खर्चाची छाननी

मुंबई येथील ॲडव्हरटायझिंग रिसर्च ब्यूरो ह्या संस्थेतर्फे, निरनिराळया वस्तूंच्या खपासाठीं वृत्तपत्रांत करण्यांत येणाऱ्या जाहिरातींवरील खर्चाचें संशोधन करण्यांत आलें आहे. हिंदुस्थान, ब्रह्मदेश व सीलोनमधील, जुलै ते डिसेंबर १९४७ च्या काळांतील जाहिरातींवरील खर्च संशोधनासाठीं निवडण्यांत आला आहे. वरील काळांत निवडलेल्या जाहिरातीसाठीं एकूण खर्च ७० लाख, ९८ हजार रुपये झाला. सगळयांत अधिक खर्च सिगारेटच्या जाहिरातीवर म्हणजे ५ लाख, ३२ हजार रुपये झाला. एकूण खर्चाशीं त्याचें प्रमाण ७.५ टक्के पडतें. सिगारेटच्या खालोखाल सौंदर्य-प्रसाधनें येतात. सौंदर्य प्रसाधनांच्या वस्तूंवर ३ लाख, ८४ हजार रुपये खर्च झाले. त्याच्या खालोखाल फौंटनपेन्स, साबण, वैमानिक प्रवास इत्यादी बाबींचा अनुक्रम लागतो. त्यांच्या जाहिरातीवरील खर्च प्रत्येकीं सुमारें ३ लाख रुपये झाला. ह्या वस्तूंनंतर २ ते ३ लाख रुपये खर्च केल्या गेलेल्या वस्तूंची यादी दिलेली आहे. यादींत दंतमंजनें, मनगटावरील व मोठीं घड्याळें, केसांना लावण्याचीं तेलें व प्रसाधनें, रेडिओ, दाढीचे मोठे वस्तरे, सेफ्टी रेझरच्या पाती, इत्यादी वस्तू आहेत. १ ते २ लाख रुपये खर्च झालेल्या यादींत १३ वस्तू आहेत. त्यांत पुढील वस्तू आहेत. टायर्स, कृमिनाशक पुड्या, चहा, अन्नांत मोडणारीं पेयें, मोटारी, बिस्किटें, चेहऱ्याला लावण्याच्या पावडरी, दांत घासण्याचे ब्रश इत्यादी. ज्या वस्तूंच्या जाहिरातीवर एक लाखापेक्षां कमी खर्च झाला अशा वस्तू ४८ दिल्या आहेत. ॲस्प्रोच्या जाहिरातींसाठीं १ लाख, १५ हजार रुपये खर्च झालेले नमूद करण्यांत आलें आहे. डोकें दुखण्यावरील दुसऱ्या कोठल्याही औषधाच्या जाहिरातींसाठीं येवढा खर्च झालेला नाहीं. कांहीं वस्तूंच्या जाहिरातींचे खर्च पुढें दिले आहेत. मॅटमोर फौंटनपेन: ९३,७७४ रु., पार्कर फौंटनपेन: ८०,००० रु., पॉंड्स क्रीम: ७५,००० रु. सेव्हन – ओ – क्लॉक रेझर ब्लेड्स व इतर ब्लेड्स ह्यांच्या जाहिरातींवर प्रत्येकीं ६०,००० रुपयांपेक्षा अधिक खर्च झालेला आहे. निरनिराळया वस्तूंच्या जाहिरातीवरील खर्चावरून त्या वस्तूंच्या खपाविषयीं अंदाज बांधणें शक्य होईल. ह्या दृष्टीनें संशोधनाची ही नवीन शाखा उपयुक्त ठरेल.

## शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्. पुणें ५)

बरेच दिवसांत वाचकांची गांठ न घेण्याचें कारण शेअर बाजारांत सांगण्यासारखें कांहींच नव्हतें हें होय. डिफर्ड १६५० ते १७०० या मर्यादेंतच अडकून राहिला होता. हैद्राबाद प्रकरणांत तडजोड होईल ही आशा व डिफर्ड शेअर विझवून टाकण्याची कंपनीची योजना यामुळें बाजार वर जाऊं पहात होता, तो हैद्राबाद प्रकरण फिसकटल्यामुळें पुन्हा १६२० वर येऊन पडला. आतां डिफर्डला केवळ ५०-५२ रुपयेच व्याज येणार अशा वावड्या बाजारांत उडूं लागल्या असल्यानें आणखी मंदीची भाषा सुरू झाली आहे. हैद्राबाद प्रकरणाचे गंभीर परिणाम आणि कमी व्याजाचा संभव इतकें असूनही डिफर्ड १६१० च्या खालीं अजूनपर्यंत दबला नाहीं यांत आमच्या मतें महत्त्व आहे. एकतर संभाव्य रूपांतरांत डिफर्डला सवलती मिळणें शक्य आहे आणि दुसरें इतकें, कमीं व्याज येऊं नये. नाहीं तर हैद्राबाद प्रकरणामुळें बाजार एव्हाना १३५०-१४०० पर्यंत खालीं तुटावयास हवा होता. याचा अर्थ, बाजारांत यापुढें तेजी होणार आहे असा मात्र करावयाचा नाहीं. भाव चालू पातळींतच डिफर्डच्या रूपांतराचा निकाल होईपर्यंत टिकून रहावेत इतकाच इत्यर्थ. गिरण विभागांत मागील दोनतीन महिन्यांत गिरण्यांचा कापडाला भाव फार आल्यानें स्थिरता आली आहे. पण ससून, स्पिनिंग, न्यू युनियन, न्यू व्हिक्टोरिया यांना आलेली नुकसानी व डिव्हिडंडला मिळालेला फाटा हें पाहतां वारा कुठल्या दिशेनें वाहतो आहे हें कळून येईल. या परिस्थितींत बँका व चांगले प्रेफरन्स शेअर्स, विशेषतः इंपिरियल, युको व सेंट्रल आणि स्टील कॉर्पोरेशन प्रेफरन्स, आणि चहाचे, नीरगुंडी, नेलियापंथी, कलासा यांकडे गुंतविणारांनी लक्ष ठेवावें, अशी सूचना आहे. चांगली व्यवस्था असलेल्या गिरण्या विष्णू, कोहिनूर, सिंप्लेक्स, बकिंगहॅम, मेटूर यांचे शेअर्स आम्हांला बोनस व चांगली व्यवस्था या दृष्टीनें आकर्षक वाटतात. बर्मा शेअर्सपासून दूर रहावें असा गंभीर इशारा बावासा वाटतो.

---

### वेस्टर्न इंडियाची अखंड प्रगति

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीनें १९४७ सालीं २ कोटी, २१ लक्ष रुपयांचें नवें काम मिळवून गेल्या वर्षांतील अडचणीच्या परिस्थितीवर मात केली आहे. १९४६ चे मानानें १९४७ सालीं नवीन कामांत २१ लक्ष रुपयांची वाढ दिसून येत आहे. कंपनीचें पंजाब व सिंध येथील काम बंद पडलें तरी सुद्धा वेस्टर्न इंडियानें नव्या कामाचे आकड्यांत उठावदार प्रगति केली आहे. १९४७ सालीं कंपनीच्या विमा निधींत ५० लक्ष रुपयांची भर पडली व तो निधी आतां ३½ कोटी रुपयांवर गेला आहे. व्याजाच्या दरांतहि सुधारणा झाली आणि कंपनीचें खर्चाचें प्रमाण हिंदुस्थानांतील सर्व कंपन्यांच्या सरासरी प्रमाणापेक्षां ८·३ इतकें कमी आहे. पॉलिसीची सरासरी रक्कम १,८८६ रु. होती ती १,९६२ रु. वर गेली आहे. नोकर वर्गाची कार्यक्षमता सुधारण्याचे दृष्टीनें कंपनीनें पुढें पाऊल टाकलें आहे, व नोकरांस उत्तेजन दिलें आहे. वेस्टर्न इंडियाची उपसंस्था, ट्रस्टी व एक्झिक्यूटर कंपनी, हिचा प्रसार करण्याचें काम चालू आहे. सध्याच्या आर्थिक परिस्थितींत विमा कंपन्यांनी कशा रीतीनें आपला कार्यक्रम आखला पाहिजे त्याचें उत्तम विवेचन कंपनीचे चेअरमन, डॉ. आगाशे, त्यांच्या भाषणांत आढळतें. वेस्टर्न इंडियानें सर्व कसोट्यांचे बाबतींत अग्रेसरत्व कायम राखलें आहे, हें अभिनंदनीय आहे.

### उटकमंड येथील परिषदेची फलश्रुति

आशिआ खंड अतिपूर्व ह्यांच्या आर्थिक उद्धाराकरितां काय करणें जरूर आहे ह्याचा विचार करण्यासाठीं संयुक्तराष्ट्र संघटनेच्या आशिआ आर्थिक समितीचें तिसरें अधिवेशन उटकमंड येथें नुकतेंच भरविण्यांत आलें होतें. औद्योगिक विकासासंबंधीं परिषदेनें केलेल्या ठरावांत औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या राष्ट्रांनीं आशिआ खंडाला भांडवली माल व मूलभूत औद्योगिक साहित्य पुरवावें, अशी मागणी करण्यांत आली आहे. मदत घेणाऱ्या राष्ट्रांनीं आपल्या तांतडीच्या गरजा आणि दूरगामी योजना ह्यांना स्पष्ट स्वरूप द्यावयाचें आहे. आशिआ खंडाच्या पैशाच्या गरजांचा विचार करून, बँकिंग व पतीच्या व्यवहारांची सुधारणा ह्या विषयीं अहवाल तयार करावयाचें ठरलें आहे. त्याप्रमाणें एका कमिशनची योजनाही झाली आहे. जपानला कच्चा माल पुरवून त्याच्या बदला जपानकडून भांडवली माल घेण्याच्या कल्पनेचा, मदत घेणाऱ्या देशांनीं ताबडतोब विचार करावा असें सुचविण्यांत आलें आहे. परिषदेंत आशिआंतर्गत प्रदेशांतील व्यापार, देशांतर्गत वहातूक आणि नद्यांना येणाऱ्या पुरामुळें होणारें नुकसान ह्याहि विषयांचा विचार झाला. शेती व अन्न ह्याविषयीं तीन ठराव मंजूर करण्यांत आले. त्यांत एक ठराव जरूरीच्या वस्तूंच्या किंमती कमी करण्यासंबंधीं आहे. समितीचें पुढील अधिवेशन ऑस्ट्रेलिआंत, बहुधा येत्या नोव्हेंबर महिन्यांत भरेल. परिषदेच्या अखेरीला कार्यकारी चिटणीस डॉ. लोकनाथन् ह्यांनीं असे उद्गार काढले कीं समितीचें योजना करण्याचें कार्य संपलें असून आतां कृतीची वेळ आली आहे.

---

**सरय्या--गाडगीळांची निवड**—हिंदुस्थान सरकारच्या इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनचे डायरेक्टर सरकारनें नेमले आहेत, त्यांत मुं. प्रां. सहकारी बँकेचे चेअरमन श्री. आर. जी. सरय्या हे आहेत. रिझर्व्ह बँकेचे बोर्डावरील एक प्रतिनिधी म्हणून प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांची बँकेनें निवड केली आहे.

**स्टेट बँक ऑफ पाकिस्तान**—स्टेट बँक ऑफ पाकिस्तानच्या शेअर्ससाठीं अर्ज पाठविण्याची मुदत वाढविण्यांत आली आहे. बँकेचें भांडवल ३ कोटी रु. असून त्यापैकी ४९% भांडवल विक्रीसाठीं काढलेलें आहे. बाकीचें भांडवल सरकार देईल. १ जुलै, १९४८ पासून ही बँक रिझर्व्ह बँकेकडून मध्यवर्ती बँकेचीं कामें स्वतःकडे घेईल.

**झेकोस्लोव्हाकिआ – पोलंड करार**—पोलंड आणि झेकोस्लोव्हाकिआ ह्यांच्यांत एक करार होऊन परराष्ट्रीय व्यापारांत एकमेकांशीं घातुक स्पर्धा न करण्याचें ठरविण्यांत आलें. परराष्ट्रीय व्यापारासंबंधींचें धोरण आणि निर्यात करावयाच्या मालाचें उत्पादन ह्या बाबत एकसूत्रीपणा आणणें हा कराराचा उद्देश आहे. मोटार सायकली, यांत्रिक हत्यारें, सोडा, शिसें, बूट, टायर्स, रंग व औषधें ह्या मालाचें उत्पादन दोघांनीं ठरवून करावयाचें आहे.

---


## महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें.

ह्या विद्यालयाचा तिसरा सहामाही शिक्षणाचा वर्ग ता. १ जुलै, १९४८ पासून नं. ५, बैरामजी जिजीभाई रोड, पुणें नं. १ ह्या ठिकाणीं सुरू होणार आहे. कमींतकमी मॅट्रिक पास झालेल्यांना प्रवेश मिळेल. त्याचप्रमाणें, सहकारी खात्यांतील व सहकारी संस्थांतील वरील शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनीं ता. २५ जूनचे आंत अर्ज करावे. फक्त ५० विद्यार्थी घेणें आहेत. अधिक माहितीसाठीं लिहावें.

११ जून, १९४८ } बा. वि. कुंभारे सुपरिंटेंडेंट.

# उद्योगधंद्यांच्या अक्रोड वृक्षाचें बीजारोपण

## भावी पिढीच्या सुस्थितीसाठी आज प्रयत्नांची शिकस्त

### श्री. शंकरराव किर्लोस्करांचें भाषण

(बुधवार दि. १६ जून, १९४८ रोजीं गोपाळ सदाशिव पारखे औद्योगिक मान पारितोषिकांच्या वितरण समारंभाच्या वेळीं मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲंड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष, श्री. शंकरराव किर्लोस्कर, यांनीं केलेलें भाषण.)

स्वातंत्र्य मिळाल्यावर आपणाला कोणता बिंदू गांठावयाचा हें सतत डोळ्यापुढें ठेवून प्रत्येक कण तो बिंदू लवकर गांठण्याकडे खर्च झाला पाहिजे. इंग्लंड–अमेरिकेंत औद्योगिक क्रांती झाल्यास शंभर वर्षें लोटून गेलीं. या अवकाशांत त्या देशांनीं अनेक प्रकारचे शोध लावून व प्रचंड खटाटोप करून जी मजल मारली ती आपणांस २०–२५ वर्षांत गांठली पाहिजे. यावरून आपला प्रत्येक क्षण किती महत्त्वाचा आहे याची सहज कल्पना येऊं शकेल. पण या भावी कार्याची जाणीव किती जणांस झालेली दिसते ? आपण उद्योगाला लागलें पाहिजे, देशांतील उत्पादन वाढलें पाहिजे, हें सर्वांना कळतें. पण कृति पहावी ती त्याच्या उलट, अशी तऱ्हा झाली आहे. सिमट नाहीं, लोखंड नाहीं, कापड नाहीं, चोपड नाहीं, व्यागनी नाहींत असा सगळीकडे नन्नाचा पाढा आणि इकडे पहावे तों कारखाने चालण्याचें काम अवघड करून टाका. अशानें देशाचें पाऊल कसें पुढें पडणार ? या अनिष्ट वृत्तीमुळें केवळ देशाचें उत्पादनच घटत चाललें आहे असें नसून हळूहळू सरकारचा कारभार देखील सुसूत्र चालणें अवघड होत आहे असें दिसून येतें.

राज्यकारभाराचे बाबतींत असा विस्कळीतपणा व शैथिल्य वाढत गेल्यास देशावर कसला प्रसंग येईल हें कोणास सांगावयास नको. ही गोष्ट हिंदुस्थानच्या शत्रूंच्या पथ्यावरच पडणार आणि आपल्या देशाला त्यांचा वाढता उपद्रव होत जाऊन आम्ही मिळविलेलें स्वातंत्र्य देखील धोक्यांत येण्याचा त्यामुळें संभव आहे. हें संकट टाळण्यासाठीं सर्वांनीं यावेळीं सावध होऊन सरकारचे हात बळकट केले पाहिजेत. कोणत्याहि कारणानें सरकार कमकुवत होऊं देतां कामा नये.

### महाराष्ट्रीय कारखानदारांची तळमळ

एवढ्यासाठीं राष्ट्राला अत्यंत तांतडीची व महत्त्वाची असलेली "उत्पादनवाढ" ही गरज भागवावयाची असेल तर सरकारनें आतां स्वतः खंबीर झालें पाहिजे व उत्पादन वाढीचे बाबतींत ज्यांचा उपयोग असेल तेच आपल्या बाजूचे व उत्पादनवाढीला जे खो बसवीत असतील ते आपले विरोधक, अशी स्पष्ट भूमिका पत्करल्यास नवी घडी बसवितां येऊन राष्ट्राची खरीखुरी प्रगति होऊं लागेल. कारखानदार जेव्हां उत्पादनवाढीवर भर देऊन बोलूं लागतात तेव्हां त्यांच्याबद्दल असा किंतु घेण्यांत येतो कीं, हे उद्गार केवळ स्वतःच्या फायद्यासाठीं त्यांच्या मुखांतून निघत असावेत. कारखाने चालवितांना फायद्याकडे नजर द्यावी लागते ही गोष्ट कोणी नाकारणार नाहीं. परंतु राष्ट्रापुढें आणीबाणीचे प्रसंग जेव्हां उभे रहातात तेव्हां त्याच्या बचावासाठीं कारखानदारहि शक्य ती कामगिरी करण्यास पुढें होतात हें कोणी विसरूं नये. देशहिताचा विचार कारखानदारांनाही असतो. आजच्या महाराष्ट्रांतील कारखानादारांपुरतेंच बोलावयाचें, तर मी बिनदिक्कतपणें अशी ग्वाही देऊं शकेन कीं त्यांच्या मनांत आपल्या देशाच्या कल्याणाची तीव्र तळमळ आहे. आपलें सरकार बळकट करण्यासाठीं ते मनापासून तयार आहेत. याचें अगदीं ताजें उदाहरण हवें असल्यास याच ठिकाणीं सुमारें दोन महिन्यांपूर्वीं महाराष्ट्रीय कारखानदारांनीं सरकारी औद्योगिक धोरणास एकजुटीनें आपला पाठिंबा दिला, एवढेंच नव्हे तर फायद्यांतील भागिदारीबद्दलचा अवघड प्रश्नहि तितक्याच निर्भयतेनें व प्रांजलपणें त्यांनीं निकालांत काढला. अशी वस्तुस्थिति असल्यानें या कारखानदारांना जवळ करून राष्ट्राच्या संरक्षणासाठीं व उन्नतीसाठीं त्यांचा जास्तींत जास्त उपयोग यावेळीं सरकारनें करणें अगत्याचें आहे.

मागील परकी सरकारचे कोणी गोडवे गाऊं नयेत. परंतु त्या सरकारनें केलेल्या कांहीं गोष्टी कित्ता म्हणून आपल्यासही पुढें ठेवतां येण्यासारख्या आहेत. हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांविषयीं ब्रिटिश सरकारला केव्हांच आस्था नव्हती. परंतु ज्यावेळीं इंग्लंडवर जर्मनीचें परचक्र आलें व हिंदुस्थानांत युद्धसामुग्री तयार केल्याशिवाय जर्मनीशीं मुकाबला करणें ब्रिटनला कठीण झालें, तेव्हां पहातां पहातां किती प्रकारचे आपल्याकडे कारखाने काढण्यांत आले व किती विविध प्रकारचा माल येथें निर्माण करण्यांत येऊं लागला, हें आपण नुकतेंच पाहिलें आहे. ती लढाई ब्रिटिशांनीं जिंकली असेल परंतु आतां हिंदुस्थानांत आपल्याला त्याहीपेक्षां मोठी लढाई दारिद्र्य व मागासलेपणा यांच्याशीं करावयाची आहे. तेव्हां हिंदुस्थानांतील औद्योगिक क्षेत्रांत विधायक कामें करण्यांत ज्यांचें पुष्कळ आयुष्य गेलें व या क्षेत्रांत ज्यांनीं पुष्कळ अनुभवही मिळविला आहे अशा सर्व विधायक कार्यकर्त्यांस विश्वासांत घेऊन व त्यांजवर कामें सोपवून राष्ट्रांत एक प्रचंड औद्योगिक आघाडी उघडण्याचें काम एवढ्याचसाठीं सरकारनें तांतडीनें हातीं घ्यावयास हवें.

### नेटाचा संघटित प्रयत्न

मधमाशा कशा काम करतात हें आपणांस माहीत आहे, परंतु ज्याप्रमाणें एका दिवसांत मधाचें पोळें तयार होऊं शकत नाहीं, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील जनतेकरितां उपलब्ध करावयाचें उच्च रहाणीचें मान व सुखसमाधान तडकाफडकी मिळण्यासारखें नाहीं. ही गोष्ट आपण ओळखली पाहिजे. आज विश्रांतीचा विचार बाजूस ठेवून सर्वांनीं उद्योग केला व नेटानें संघटित प्रयत्न चालवला तरच आपल्यास नसली तरी आपल्या भावी पिढीला तरी चांगली स्थिती येईल हें प्रत्येकानें ओळखलें पाहिजे. सरकारनें व प्रत्येक पुढाऱ्यानें जनतेला हें सत्य न कचरतां प्रांजलपणें सांगितलें पाहिजे. अक्रोडाचें झाड लावतांना जी वृत्ति व भावना पाहिजे त्याच वृत्तीनें राष्ट्राच्या उद्योगवृक्षाचें बीजारोपण आपण केलें पाहिजे. ज्या ज्या मार्गानें राष्ट्रांतील उद्योगधंदे वाढण्याला अधिक अवसर मिळूं शकेल त्या त्या गोष्टी शीघ्रतेनें हातीं घेतल्या पाहिजेत व या कामीं ज्या ज्या व्यक्तींचा कोणत्या ना कोणत्या प्रकारें उपयोग होऊं शकेल त्यांना हाताशीं धरलें पाहिजे. अशा व्यक्तींना सरकारनें व जनतेनें भरपूर उत्तेजन दिलें पाहिजे.

महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांची वाढ होण्यास स्वस्त विजेची शक्ती ही पहिली व सर्वांत मोठी गरज आहे. सुदैवानें आपल्या पाठीशीं उभा असलेला सह्याद्रि व त्यांतून निघणाऱ्या नद्या आपल्यास उदंड मापानें वीज पुरवण्यास सिद्ध आहेत. एका कोयना नदीला धरण बांधल्यास तीन लक्ष अश्व शक्तीची वीज बाहेर पडूं शकेल व या विजेनें हां हां म्हणता महाराष्ट्राची कायापालट होऊन स्वित्सर्लंड देशासारखा उद्योगधंद्यांनीं गजबजलेला व समृद्ध असा आपला प्रांत होऊं शकेल. शेतीचें उत्पन्नही अनेक पटीनें वाढून दुष्काळांतून जनतेची कायमची मुक्तता होऊं शकेल.

## मुंबई प्रांताचें सहकारी खातें

### खर्च किती आला ?

| खर्चाची बाब | १९४४-४५ | १९४५-४६ |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| अधिकाऱ्यांचा पगार | १,१०,५४३ | १,०५,०२८ |
| नोकरवर्गाचा पगार | ४,५४,५६८ | ४,६४,८७४ |
| अलावन्स, ऑनरेरियम | ३,०३,७३५ | ५,२०,४०७ |
| किरकोळ | ६५,३६७ | ८२,७०८ |
| सहकारी संस्थांना ग्रँटः- | | |
| मुं. प्रां. स. इन्स्टिटयूट | १४,००० | —— |
| मागासलेल्या सोसायटया | १,४९० | १,४४० |
| लँड मॉर्गेज बँक | ७५० | ७५० |
| सुपरवायझिंग यूनियन्स | ५२,८६० | ५१,२०० |
| मल्टिपर्पज सोसायटया | २,३०१ | ९,६१२ |
| क्रॉप प्रोटेक्शन, मार्केटिंग व बेटर फार्मिंग सोसायटया | १६,६११ | २३,२९० |
| फेन्सिंग सोसायटया | ५०० | ५०० |
| जिल्हा सु. यू. बोर्डाच्या शिक्षण कमिटया | २२,१७० | — |
| स्त्रियांच्या सोसायटया | १५० | ४५० |
| | १०,४४,६९३ | ११,७०,३६९ |
| वजा जमा | | |
| ऑडिट फी | १,३८,०४३ | १,५८,४९० |
| किरकोळ | १,१३,९८४ | ८२,२४५ |
| | — २,५२,०२७ | २,४०,७३५ |
| एकूण निव्वळ खर्च | ७,९२,६६६ | ९,२९,६३४ |

## जी. डी. सी. ए. परीक्षेचा निकाल

पुणें येथें एप्रिल, १९४७ मध्यें झालेल्या जी. डी. सी. ए. च्या परीक्षेंत खालील उमेदवार उत्तीर्ण झाले आहेतः-

**Whole Examination**

**Ist Class**

Dhole M. G. (*Poona Central Co-op. Bank*)

**Pass Class**

Awaghan S. L., Chebbi M. H.,
Chitambar A. J., Hiremath S, S.
Kamoji P. K., Mahvy M. S.,
Mulay G. S., Walambe G. G.,
Kotur G. G., Pommannawar C. I.
Raichur H. P., Yadhalli S. B.

**Passed in Accountancy Group Only**

Patwardhan P. K., Masyagar M. S.,
Konnur A. G., Samant Y. R.,
Shah S. D.

**Passed in Co-operation Group Only**

Byahatti S. R., Chiniwar G. B.,
Jahibal M. S., Joshi R. R.,
Karadi S. N., Kher A. N.,
Mutalik S. S., Sakle A. H.;
Saunshi B. A.


# विजय टेक्सटाइल्स लि.

—येरंडवणा, पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंटस्.

## DECCAN INSTITUTE OF COMMERCE, POONA.

(Recognised by Government.)

Opens for the 1948-49 Session on Thursday the 24th inst. Students coached up for the G.D.C. and C., L. C. C., D. Com. (I. M. C.), R. A. (1st), G. D. C. and A., A. C. W. A., A. C. C. S., Shorthand and Typewriting. Courses suitable for Non-matriculates, Matriculates and Graduates. Classes in the Morning and Evening. Prospectus free on application to:

Institute's Building,
594, Budhwar Peth,
Jijamata Bag Corner,
Poona 2.

Secretary.

# निवडक व उत्कृष्ट मासे

★ मोठे पॉपलेट्स ★ सुरमाई ★ घोळ ★ दाढा ★ रावस

स्थानिक व बाहेरगावच्या विक्रेत्यांना व हॉटेलसाठीं लागणारे घाऊक व किरकोळ मासे योग्य भावांत मिळतील.

फ्रोझन फूड कंपनी

(१) मुळा रोड, पुणें ३ (२) स्टॉल नं. ४१ कॅन्टोन्मेंट फिश मार्केट, पुणें १

# परदेशांतील आर्थिक बातम्या

**अमेरिकेंतील कच्च्या फिल्मचें उत्पादन**—दुसऱ्या महायुद्धानंतर सगळीकडे कच्च्या फिल्म्सचा तुटवडा भासूं लागला. तथापि, आतां अमेरिकेंतील उत्पादन मागणी पुरवण्याइतकें वाढत चाललें आहे. फिल्म्सच्या टंचाईमुळें बोलपट काढणारे व दाखविणारे ह्या दोघांनींहीं वांटप-पद्धति स्वीकारली होती, परंतु लवकरच मुबलक पुरवठा होऊन वांटप-पद्धति चालू ठेवण्याचें कारण उरणार नाहीं असा अंदाज आहे. असें असलें तरी ८ व १६ मिलिमीटरच्या सिनेमा फिल्म्सचा पुरवठा अद्यापही पुरेसा नाहीं.

**पोष्टासाठी सरळ उडणारें विमान**—पूर्व इंग्लंडमध्यें टपालाची ने-आण करण्यासाठी हेलिकॉप्टर जातीचें सरळ उडणारें विमान प्रथमच वापरण्यांत आलें. हें विमान २२५ मैलांची सफर करून १३ हजार पत्रांचा बटवडा करणार आहे.

**झेकोस्लोव्हाकिआ व रशिआ ह्यांचा करार**—झेकोस्लोव्हाकिआ आणि रशिआ ह्यांच्यांत एक गुप्त करार झाला असल्याची बातमी आहे. ह्या करारान्वयें बोहिमिआ प्रांतांतील युरेनिअमच्या खाणींवर रशिआला पूर्ण ताबा मिळणार आहे. करार ऑक्टोबर, १९४५ मध्यें झाला. त्यानंतर खाणींतील झेक शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ ह्यांच्या जागीं रशिअनांची नेमणूक करण्यांत आली. अणुशक्तीवर चालणारें एखादें घातक अस्त्र शोधून काढण्याच्या रशिआच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणजेच हा करार होय. युरोप खंडांत फक्त बोहिमिआंतच युरेनिअमच्या खाणी आहेत. क्युरी पति-पत्नींनीं रेडिअमचा शोध १८९८ सालीं प्रथम लावला तो ह्याच खाणींतील युरेनिअमच्या उपयोगानें.

**चीनसाठी अमेरिकन धान्य**—अमेरिकेकडून चीनला १ हजार टन तांदूळ लवकरच रवाना होणार आहे. त्याच्या मागोमाग जून अखेरीस ७,१०० टन कणिकही धाडण्यांत येणार आहे.

**रशिआ-हॉलंड करार**—रशिआ आणि हॉलंड ह्यांच्या दरम्यान व्यापारी कराराच्या वाटाघाटी गेले दोन महिने चालू होत्या. त्या यशस्वी होऊन मॉस्कोंत उभय देशाच्या प्रतिनिधींनीं देवाण-घेवाणीचा करार नुकताच केला. ह्या कराराचा तपशील मात्र अद्याप जाहीर करण्यांत आलेला नाहीं.

**१०० पौंडांच्या भांडवलावर १ लाख पाड नफा**—ऑस्ट्रेलिआंतील ॲडिलेड शहरीं मि. मिल्स नांवाच्या एका गृहस्थानें एका सोन्याच्या खाणीचा अर्धा भाग १०० पौंड उसने घेऊन १९४२ सालीं विकत घेतला होता. पुढें ही कंपनी मेलबोर्नमधील एका सोन्याच्या कंपनीनें विकत घेतली. त्यावेळीं वरील गृहस्थाला त्याच्या अर्ध्या भागाची १ लाख पौंड किंमत आली.

**ज्यूंचें सरकार कर्ज मागणार**—पॅलेस्टाइनमध्यें स्थापन झालेलें हंगामी ज्यू सरकार एक्सपोर्ट-इम्पोर्ट बँकेकडून सुमारें २ कोटी पौंडांचें कर्ज घेण्याच्या विचारांत आहे. अमेरिकेचे अध्यक्ष प्रे. ट्रूमन, ह्यांनीं असें कर्ज मिळण्याची शक्यता नुकतीच ध्वनित केली होती. ज्यूंना पॅलेस्टाइनमध्यें वसाहतीसाठी आणणें आणि शस्त्रास्त्रें खरेदी करणें, ह्या दोन कामासाठीं ज्यू सरकारला कर्ज पाहिजे आहे. पण, अशा कामासाठीं कर्जे देणें बँकेच्या कक्षेबाहेरचें आहे, अशी टीका करण्यांत येत आहे.


## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



दि

## बँक ऑफ इंडिया, लि.

**स्थापना १९०६**

खपलेलें भांडवल :- ३,००,००,०००.
वसूल झालेलें भांडवल :- १,५०,००,०००.
राखीव फंड :- २,००,००,०००.
मुख्य कचेरी :-ओरिएंटल बिल्डिंग्ज, मुंबई.

इतर शाखा :- मुंबईः- बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबा देवी व मलबार हिल. मुंबई नजीकः-वांद्रें व अंधेरी. अहमदाबादः-भद्र ( मुख्य शाखा), इलिस ब्रिज, माणिक चौक व स्टेशन शाखा. कलकत्ता :-क्लाइव्ह स्ट्रीट ( मुख्य शाखा ), बडा बाजार व चौरंघी स्क्वेअर. नागपूरः-किंग्ज वे व इतवारी बाजार. पुणें:-लष्कर व शहर. मद्रास, कोईमतूर, कालिकत, अमृतसर, भुज (कच्छ), जमशेटपूर, जुनागड, कराची, पालनपूर, राजकोट, सुरत, सोलापूर, वेरावल.

लंडन शाखा :- १७ मूरगेट, लंडन ई. सी. २.

न्यूयॉर्क एजंट्स :-दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

डायरेक्टर्स :-सर कासवजी जहांगीर, बॅरोनेट, जी. बी. इ., के. सी. आय. इ. चेअरमन; श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, ना. सर शांतिदास अस्करन, नाइट, मि. महंमद सुलेमान कासम मिठा, सर किकाभाई प्रेमचंद, नाइट, श्री. भगवानदास सी. मेहता, श्री. कृष्णराज एम. डी. ठाकरसी.

चालू ठेवीचें खातें:—कांहीं ठिकाणें सोडून रोजच्या रु. ३०० ते रु. १ लक्ष पर्यंतच्या शिलकेवर दरसाल द. शें. एकचतुर्थांश रु. व्याज देण्यांत येतें. रु. १ लाखाहून जास्त शिलकेवर खास योजनेनें व्याज दिलें जातें. सहामाही व्याज रु. ५ पेक्षा कमी झाल्यास तें दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य अटींवर स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें. विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

बी. एन्. अटल, एजंट, पुणें







## वेस्टर्न इंडिया विमा कं. लि.

कंपनीचे चेअरमन, डॉ. मो. ना. आगाशे, एम. बी. बी. एस. ह्यांचें सन १९४८ च्या वार्षिक सभेंतील भाषण.

(२०-६-१९४८)

कंपनीच्या इतिहासांत आणखी एका वैभवशाली वर्षाची भर पडली असून नवीन कामाचा आकडा दोन कोटी एकवीस लक्ष रु. वर गेल्याचें आपणांस दिसून येईल. १९४६ सालचे कामापेक्षा हा आकडा एकवीस लक्षांनीं अधिक आहे.

गेली दोन तपें अत्यंत परिश्रम व हजारों रुपये खर्चून पंजाब व सिंधमध्यें आपल्या कंपनीचा जो जम आम्ही बसविला होता ते आमचे सर्व प्रयत्न एका क्षणांत धुळीला मिळाले. कराची व लाहोर येथील शाखाकचेऱ्या आम्हांस बंद कराव्या लागल्या व हजारो रुपयांचें नुकसान सोसून आम्हांस परत यावें लागलें. या सर्व घडामोडींचा परिणाम म्हणून १९४७ सालांत कामाची तूट येणार कीं काय असाहि संशय येऊं लागला. पण अत्यंत आनंदाची गोष्ट अशी कीं हे भावी संकट ओळखून हिंदुस्थानांतील सर्व शाखाकचेऱ्या व एजंट मंडळींनी चंग बांधून दिन-रात्र परिश्रम केले व त्याचेंच दृश्य फल म्हणजे गुदस्ताची नवीन कामांतील २१ लक्षांची वाढ होय.

### विमा कर : एक सूचना

विशिष्ट मर्यादेपुढें ज्यांचें उत्पन्न आहे त्यांना विमा घेण्यास भाग पाडणारे कायदे सरकारनें कां करूं नये? आपल्या पश्चात आपल्या मुलाबाळांनीं सुखानें जगावें कीं भीक मागत हिंडावें हें ठरविण्याचा अधिकार (ज्या ठिकाणीं अशी परीस्थिति टाळणें शक्य आहे तेथें तरी) कोणाहि व्यक्तीस असतां उपयोगी नाहीं.

ज्या ठिकाणीं प्राप्तीवरील कराची सूट हक्कानें मिळूं शकते पण लोक विमा उतरून ती घेत नाहींत, तेथें तरी अल्प सुरवात म्हणून सरकारनें उत्पन्नाच्या ठराविक प्रमाणांत तेवढी रक्कम विमा कर म्हणून कां वसूल करूं नये? सरकार कर म्हणून ती वसूल करूं लागलें कीं लोक आपोआप विमा उतरून तेवढ्या रकमेपुरतें तरी संरक्षण घेतील यांत मुळींच संशय नाहीं. सुरवातीस असा कायदा केला तर ओरड होईल हें खरें. पण हळू हळू त्याचे सुपरिणाम दिसूं लागले म्हणजे लोक आनंदानें आपण होऊनच विम्याकडे वळतील व अशा रीतीनें विम्याचा फैलाव होईल.

### विमा व्यवसायाचें राष्ट्रीयीकरण

विमा व्यवसायाचें राष्ट्रीयीकरण करितां येईल किंवा कसें याचा विचार बरेच दिवस वरिष्ठ अधिकाऱ्यांत चालू असल्याचें कळतें. राष्ट्रीयीकरणानें विमा व्यवसायास चालना मिळून त्याची वाढ होईल असें कांहींना वाटतें. व्यक्तिशः मला हे विचार पटत नाहींत. जोंपर्यंत सरकारपाशीं हे धंदे यथायोग्य चालविण्याजोगी चोख योजना नाहीं तोंपर्यंत त्यांनीं या प्रश्नाला हात न घातलेलाच बरा. सरकारला खरोखरच या धंद्याची वाढ व्हावी अशी इच्छा असेल तर त्यांनीं मी आतांच सांगितलेली सक्तीच्या विमा कराची योजना अमलांत आणावी. एकदां ही सक्तीनें दिलेली कराची गोळी पचविण्याची संवय झाली म्हणजे आपोआप हा प्रश्न सुटेल व विमाव्यवसायहि वाढीला लागेल. युद्धकाळांत कांहीं बाबतींत वॉर रिस्क म्हणून सरकारनें विम्याची सक्ती केली होती त्याच-प्रमाणें आतांही करावें अशी माझी सूचना आहे.

### गुंतवणूक व त्यावरील व्याज

सध्यां विमा कंपन्यांपुढें अत्यंत जाचक प्रश्न जर कोणता असेल तर आलेला पैसा योग्य प्रकारें गुंतवावा कोठें व त्यावर जास्तींत जास्त व्याज मिळावें कसें हा आहे. दिवसेंदिवस व्याजाचा दर खालीं येत आहे तसतसें खर्चाचें प्रमाण वाढत आहे. या दोहोंची तोंडमिळवणी करण्याचा एकच मार्ग आहे, आणि तो म्हणजे हप्त्याचे दर वाढविणे व खर्चांत काटकसर करणें हा होय. कांहीं कंपन्यांनीं याही मार्गाचा अवलंब करून पाहिला पण त्यांनाही तो प्रश्न सुटला असें वाटत नाहीं. या अडचणींच्या भरीस विमा कंपन्यांना द्यावा लागणारा प्राप्तीवरील जबर कर हीही एक आपत्ति आहे. या प्राप्तीवरील करानें विमा कंपन्यांच्या नफ्यापैकीं एकतृतीयांश भाग सरकार खाऊन बसते. त्या शिवाय विमा कायद्याचीं काटेकोर बंधनें आहेत तीं निराळींच.

### गृहदुर्भिक्षावर उपाय

यावरहि एक उपाय आहे. तूर्त घराच्या तारणावर कर्जाला बरीच मोठी मागणी आहे व त्यावर मिळणारा व्याजाचा दरही बऱ्यापैकीं आहे; जर अशा प्रकारें घराच्या तारणावर कांहीं प्रमाणांत विमा कंपन्यांनीं पैसे गुंतविले तर त्या पैशावर घर मालकांना नवीन घरें बांधण्यास अथवा जुनी दुरूस्त करण्यास मदत होईल व त्यामुळें बहुजन समाजाची घराचे बाबतींत जी दीर्घकाल कुचंबणा होत आहे तो प्रश्न सोडविण्यास अप्रत्यक्षपणें थोडफार मदत होईल. या प्रश्नाची जी दुसरी बाजू आहे, त्याचाही विचार करा. घरें बांधण्यासाठीं पैसे देण्यापेक्षां कंपन्यांनींच प्रमुख शहरांतून स्वतःच्या मालकीच्या इमारती बांधून लोकांची थोडीफार सोय कां करूं नये?

माझी अशी समजूत आहे कीं सरकारनें इमारत बांधण्यासाठीं जरूर ती साधनसामुग्री योग्य त्या भावांत पुरविण्याची कंपन्यांना हमी दिली तर कांहीं विशिष्ट कंपन्यांना तरी ही योजना सफळ करून दाखविणें कठीण जाणार नाहीं. त्यामुळें सध्यांचें गृहदुर्भिक्ष थोडें फार कमी होईल व कंपन्यांची व लोकांचीही सोय होईल.

### आमचा वार्षिक अहवाल

गेल्या सालीं कंपनीच्या विमानिर्धींत ५० लाख रुपयांची भर पडली असून तो निधी आतां ३,२५,३६,८३६ रु. इतका झाला आहे. १९४७ सालांतील व्याजाचा दरही १९४६ सालापेक्षां थोडा अधिक आहे. कंपनीच्या एकंदर खर्चाचें प्रमाण २३.०९ इतकें आहे. हिंदुस्थानांतील सर्व कंपन्यांचें सरासरी खर्चाचें प्रमाण पाहिलें तर तें ३१.२ इतके येते. त्यादृष्टीनें आपल्या खर्चाचें प्रमाण अत्यंत समाधानकारक आहे असें आपणासही वाटेल. १९४६ सालीं पॉलिसीची सरासरी रक्कम जी १८८३ रु. होती ती १९४७ सालांत १९६२ रु. वर गेली ही गोष्टही कंपनीस भूषणावह आहे.

### ट्रस्टी व एक्झिक्युटर कंपनी

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची उपसंस्था म्हणून ट्रस्टी आणि एक्झिक्यूटर कंपनीची १९४६ सालांत स्थापना झाली. पण कंपनीच्या कामास खरी सुरवात गेल्या सालापासूनच झाली असून कंपनीचे नेतृत्व वेस्टर्न इंडियांतील जुने अधिकारी श्री. एस. जी. भावे, बी. ए., एलएल. बी. यांजकडे सोपविलें आहे. श्री. भावे हे कंपनीच्या कामाचा प्रसार व्हावा म्हणून अहर्निश प्रयत्न करीत आहेत, व वेस्टर्न इंडिया प्रमाणें हीही कंपनी लवकरच लोकादरास व प्रशंसेस पात्र होईल असा मला भरंवसा आहे.

---

**आवाजाच्या गतीपेक्षा अधिक वेगाचें विमान**—'एव्हिएशन वीक' नांवाच्या इंग्लिश साप्ताहिकानें अशी बातमी प्रसिद्ध केली आहे कीं, जर्मन माहितीच्या आधारानें रशिआनें एक 'जेट' वर चालणारें विमान बांधण्यांत यश मिळविलें आहे. या विमानाची गति ध्वनि लहरींपेक्षाही अधिक आहे. आवाजाची गति तासाला ७०० पेक्षा अधिक मैल असते.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
ग. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.